पुरोगामी विचाराचे
एकमत



# तेरणामध्ये सायबर गुन्हेगारी विषयी जनजागृती



**उस्मानाबाद** : जिल्हा पोलीस दलाच्या वतीने येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये सायबर गुन्हेगारी विरोधी जनजागृती करण्यासाठी विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना समाजामध्ये कशा पद्धतीने सायबर गुन्हेगारी घडते याविषयी क्रिक हिल फाऊंडेशनच्या पथनाट्यातून जनजागृती केली.

यावेळी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांच्यासह विभाग प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना पोलीस अधिक्षक कुलकर्णी म्हणाले, सायबर क्राईमबाबत प्रत्येकाने सतर्कता बाळगली पाहिजे. विद्यार्थ्यांनी तर स्वतः सतर्कता बाळगून आपले नातेवाईक, पेन्शनर यांना जागृत केले पाहिजे. चुकून एखाद्याच्या बाबतीत अशी सायबर फसवणूक घडली तर तात्काळ संबंधित सायबर विभागाशी संपर्क केल्यास पुढील अनर्थ टळू शकतो. यावेळी प्राचार्य डॉ. विक्रम सिंह माने म्हणाले, अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या २०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सायबर सिक्युरिटी संबंधी सिस्कोचा कोर्स पूर्ण केला असून, १०० विद्यार्थ्यांनी इंटरशिप पूर्ण केल्याने ते विद्यार्थी इतरांना याविषयी सजग करू शकतात. सूत्रसंचलन संजय मैंदर्गी तर संयोजन प्रा. प्रमोद तांबारे यांनी आभार मानले.

पथनाट्यानंतर पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी तेरणा रेडिओ स्टेशन, सिस्को सेंटर, नुकतेच सुरू केलेल्या ड्रोन सेंटरला भेट दिली. महाविद्यालयाचे व्यवस्थापन विद्यार्थ्यांना देत असलेल्या सुविधा पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच तेरणा रेडिओ सेंटरमध्ये मुलाखत दिली आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला.